पुणे महानगरपालिका

**✻ स्थायी समिती ✻**

कार्यपत्रिका क्रमांक ३२

स्थायी समितीची साप्ताहिक सभा **मंगळवार दि. २३/१०/२००७** रोजी सकाळी ११:३० (साडे अकरा) वाजता **म.ज्योतिबा फुले सभागृहात** (स्थायी समिती सभागृहात) भरेल.

सदर सभेत खालील विषयांचा विचार होईल.

**दाखल विषय**

**विषय क्र. ९६०**

मा.अरुण धिमधिमे, मा.संदिप लडकत, मा.महादेव बाबर, मा.सुनिल बनकर, मा.सौ.ज्योत्स्ना सरदेशपांडे, मा.दिलिप उंबरकर, मा.सौ.अलका खाडे, मा.राजन काची, मा.सौ.कमल व्यवहारे, मा.दिपक मानकर, मा.सुनिल कांबळे, मा.आबा बागूल, मा.वसंत मोरे व मा.विजय मारटकर यांचे दि. २३/१०/२००७ चे पत्र.

महानगरपालिकेच्या स्थायी समितीच्या माध्यमातून गेली १६ वर्षापासून म्हणजेच सन १९९२ पासून महापालिका आयुक्तांना वेळोवेळी दिलेले अधिकार या ठरावान्वये रद्द करण्यास मान्यता देण्यात यावी.

**विषय क्र. ९६१**

मा.विकास मठकरी, विरोधी पक्षनेता, मा.शाम देशपांडे, मा.सौ.ज्योत्स्ना सरदेशपांडे यांचे दि. १९/१०/२००७ चे फेरविचाराचे पत्र.

स्थायी समिती ठराव क्र. ९१६ दि. १६/१०/२००७ चा फेरविचार करण्यात यावा. (जे.एन.एन.यु.आर.एम.अंतर्गत पुणे शहरामधील मुठा व मुळा-मुठा नदी सुधारणा, कात्रज व पाषाण तलाव सुधारणा व नाल्यांच्या विकास कामाकरीता तज्ञ सल्लागार म्हणून नेमणूक करणेसाठी निविदा मागविण्याबाबत)

**विषय क्र. ९६२**

पुणे मनपा वसाहत क्र. ६, गंजपेठ येथील सफाई कामगारांनी अनधिकृत बांधलेल्या शेडस् पाडल्यामुळे त्यांचे तात्पुरते पूनर्वसन ई.डब्ल्यू.एस. (ए.थ.ड.) अंतर्गत धनकवडी स.नं. १४/१+१६ पार्ट येथील सुमारे १०० सदनिका उपलब्ध झालेल्या असून सदर सदनिका मा.महा.आयुक्त यांचे विषयपत्रासोबत जोडलेल्या यादीनुसार अ.क्र. १ ते ५८ रहिवासी कर्मचाऱ्यांचे ६ महिने कालावधीसाठी भाडे कराराने तात्पूरते पुनर्वसन करण्यास मा.स्थायी समितीमार्फत मा.मुख्य सभेची मान्यता मिळणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे क्र. मआ/उआ(चाळ)/५४९ दि. १८/१०/२००७ चे पत्र.

**शरद समेळ,**
**नगरसचिव,**
**पुणे महानगरपालिका**